Vivekanand Shikshan Sanstha’s

**Vivekanand Arts, Sardar Dalipsingh Commerce & Science College**

Samarthnagar, Aurangabad.

Date : 09.08.2019

# PRESS RELEASE

## "यशासाठी स्वप्नातही अभ्यास"

## विवेकानंद महाविद्यालयात आदित्य मिरखेलकर यांचे प्रतिपादन

आज दिनांक ९/८/२०१९ रोजी सकाळी ११ वाजता औरंगाबाद येथिल विवेकानंद महाविद्यालयामध्ये 'यूपीएससीची वारी औरंगाबाद २०१७' वतीने विद्यार्थ्यांसाठी केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परिक्षा आणि करिअर मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नुकतेच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अंतिम निवड यादीत १५५ व्या रँकने यश संपादन करून IPS झालेले श्री. आदित्य मिरखेलकर आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे असिस्टंट कमांडंट पदी निवड झालेले श्री. उदय जाधव यांनी सदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना यूपीएसीच्या पुर्व, मुख्य आणि मुलाखत परिक्षासंबंधी सविस्तर मार्गदर्शन केले.

श्री. आदित्य मिरखेलकर यांनी विद्यार्थ्याच्या मनातील यूपीएससी परीक्षेबद्दलच्या शंकांचे निरसन केले. भारतातील सर्वात कठीण मानल्या जाणाऱ्या यूपीएससी परीक्षेत यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम, योग्य मार्गदर्शन, चिकाटी, शिस्त आणि योग्य संगत यांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे असा संदेश यावेळी दिला. तसेच परिश्रम एवढे घ्यावे कि स्वप्न सुद्धा अभ्यासाचेच यावे असे मत व्यक्त केले. पूर्व परीक्षेची तयारी, अभ्यासक्रम, निवडक संदर्भ पुस्तके, मुख्य परीक्षेची तयारी, वैकल्पिक विषयाची निवड व अंतिमतः मुलाखत प्रक्रिया या सर्व टप्प्याविषयीचे सविस्तर मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

श्री. उदय जाधव हे याच महाविद्यालयातील कला शाखेचे माजी विद्यार्थी असून त्यांनी पहिल्याच प्रयत्नामध्ये यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन असिस्टंट कमांडंट हे पद मिळवले. हे यश मिळवण्यामध्ये महाविद्यालयातील शिक्षकांचे फार मोठे मार्गदर्शन मिळाल्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त केले. तसेच आपल्या प्रमाणे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनी देखील कठोर परिश्रम घेऊन यश संपादन करून महाविद्यालयाचा नावलौकिक करावा हि अपेक्षा व्यक्त केली.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य ड़ाॅ शाम शिरसाठ होते. याप्रसंगी विवेकानंद शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. प्रभाकर मोरे, जलक्रांती ग्रुप महाराष्ट्र राज्याचे प्रा. प्रशांत अवसरमल, महाविदयालयाचे उपप्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र शेजूळ, तसेच महाविद्यालयातील

विद्यार्थी आणि प्राध्यापक वृंद  मोठ्या संख्येत उपस्थित होते. डॉ. ज्ञानेश्वर सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीमती शर्मिष्ठा ठाकूर यांनी केले तसेच आभारप्रदर्शन डॉ. कैलास भरकड यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. अरुण वाहुळ आणि प्रा. विवेक आवारे यांनी परिश्रम घेतले.




